REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २६ जुलै, १९५० अंक ३०

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरी:–५५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखा:–( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखा:– (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन.

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१८,२६५ |
| खेळतें भांडवल | रु. ७१,००,००० |

मुंबई शाखा:–कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पॅटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**संतति-नियमनाचें केंद्र**—कटक येथील मेडिकल कॉलेज-मध्यें संततिनियमनाची माहिती देणारें एक केंद्र काढण्याचें ओरिसा सरकारनें ठरविलें आहे. गोपाळ बंधु आयुर्वेद संस्थेला जोडून एक रुग्णालय काढण्यासाठीहि सरकारनें रक्कम मंजूर केली आहे. ह्या रुग्णालयांत २६ रोग्यांची सोय करण्यांत येणार आहे. प्राथमिक खर्चासाठी ३१,००० रुपये आणि दरवर्षी १५,४८७ रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**मि. चर्चिल ह्यांच्या बागेंत फिरण्यास परवानगी**—ब्रिटिश हुजूर पक्षाचे पुढारी मि. चर्चिल ह्यांनीं केंट परगण्यांतील आपल्या निवासस्थानाची बाग लोकांना फिरण्यास खुली केली आहे. बागेंत प्रवेश मिळण्यासाठी प्रत्येक पाहुण्याला १ शिलिंग द्यावा लागतो. परंतु हे पैसे मि. चर्चिल घेणार नसून ते स्थानिक चर्चला देण्यांत यावयाचे आहेत. मि. चर्चिल ह्यांचें हें निवासस्थान १६ व्या शतकांत बांधलेलें आहे.

**पटकथा आणि निर्माते**—बंगाली ग्रंथकार आणि नाटककार श्री. ताराशंकर बानर्जी ह्यांची फिल्म इन्कायरी कमिटीपुढे साक्ष झाली. ते म्हणाले कीं मूळ कादंबरींतील अगर गोष्टींतील कथानका-प्रमाणें चित्रपट क्वचित्च घेण्यांत येतो. चित्रपटांतील कथाभाग नीट राखण्यासाठी ग्रंथकार, निर्माते आणि दिग्दर्शक ह्यांचें सहकार्य होणें जरूर आहे.

**महात्मा गांधींचा पुतळा**—बडोद्यांतील पद्मावती बागेंत महात्मा गांधींचा ९॥ फूट उंचीचा एक पुतळा उभारण्यांत येणार आहे. महात्माजी हातीं काठी घेऊन आश्रमांतून बाहेर पडत आहेत अशा अवस्थेचा हा पुतळा तयार करण्यांत येणार आहे. पुतळ्याचा शाडूच्या मातीचा नमुना तयार झाला आहे. त्यावरहुकूम ब्रॉंझ धातूचा पुतळा जर्मन शिल्पकार मि. ढोरिंग हे तयार करणार आहेत.

**संयुक्त प्रांतांत बैलांची पैदास**—संयुक्त प्रांतांत बैलांची पैदास करण्यासाठी ८ मैल लांब आणि १ मैल रुंद अशी एक शेत वसाहत करण्यांत येणार आहे. ह्या टापूंत बैलांना मोकळेपणानें चरता येईल. ह्या मोठ्या शेतांत गुरांना योग्य असें गवत लावण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें शेतीच्या योग्य चांगल्या वळूंची पैदासही करण्यांत येणार आहे.

**भाडें जमविण्यासाठी भाषण**—कोलंबो येथील एक बौद्ध भिक्षू तिसऱ्या वर्गाचें तिकिट काढून दुसऱ्या वर्गाच्या डब्यांतून प्रवास करीत होता. रेल्वे अधिकाऱ्यांनीं त्याच्याकडून जादा आकार मागितला, परंतु त्याच्याजवळ पैसे नव्हते. बौद्ध भिक्षू मुळींच घाबरला नाहीं; त्यानें प्लॅटफॉर्मवर लगेच एक व्याख्यान दिलें आणि जरूर तितके पैसे उतारूंकडून मिळविले.

**सीलोनमध्यें स्त्री-गुन्हेगार**—१९४५ मध्यें सीलोनमध्यें १७० स्त्रियांनीं गुन्हे केल्याची नोंद झालेली आहे. १९४९ मध्यें स्त्री-गुन्हेगारांच्या संख्येंत वाढ झाल्याचें आढळून आलें आहे. १९४९ मध्यें सर्व प्रकारच्या गुन्ह्यांत ३७४ स्त्रिया सांपडल्या अशी माहिती पोलिसांनीं दिली आहे.

**सावकारी कायदा**—सावकारी कायद्याच्या नियमांत दुरुस्ती करणारा एक मसुदा मुंबई सरकारनें ६ जुलैच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध केला आहे. ह्या मसुद्यासंबंधीं कोणाला कांहीं आक्षेप घ्यावयाचे असतील अगर कांहीं सूचना करावयाच्या असतील तर त्या ता. ५ ऑगस्ट १९५० पर्यंतच स्वीकारण्यांत येतील.

**मद्रासमध्यें नवें रुग्णालय**—मद्रास सरकारनें पुथुर मेंद्रानावर म. गांधींच्या स्मृतीसाठीं म्हणून एक नवीन रुग्णालय बांधलें आहे. ह्या ठिकाणीं भरलेल्या एका मोठ्या सभेंत महात्माजींनीं भाषण केलें होतें. रुग्णालय बांधण्यास २५,००,००० रुपये खर्च आला. इमारतींत शस्त्रक्रिया करण्याच्या खोल्या आणि क्षयरोग्यासाठी एक भाग बांधण्यांत आला आहे. एकावेळीं २०० रोगी मावतील अशी सोय करण्यांत आली आहे.

**पाकिस्तानकडून सीलोनला साखर**—पाकिस्ताननें सीलोनला १०,००० मण साखर देण्याचें कबूल केलें आहे असें समजतें. ह्या पुरवठ्यापैकीं २,००० टन साखर रवानाहि झाली आहे. खुद्द पाकिस्तानांत साखरेचे कारखाने नसतांना ही साखर निर्यात होत आहे. कदाचित् जाव्हासारख्या देशांतून आयात केलेली साखर सीलोनला निर्यात केली जात असावी.

**पोलंडला सोव्हिएट रशियाची यंत्रसामुग्री**— पोलंडमधील ६० निरनिराळ्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री पुरविण्याचें सो. रशियानें कबूल केलें आहे. भांडवलदारी राष्ट्रांशीं औद्योगिक संबंध प्रस्थापित करण्याविषयीं पोलिश उपपंतप्रधान म्हणाले, कीं पोलंडमध्यें समाजवादी अर्थव्यवस्था उभारण्यास त्यांची जितकी मदत होईल त्या मानानें आम्ही त्यांच्याशीं संबंध ठेवूं. पोलंडचा सहा वर्षांचा औद्योगिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी त्या देशाला भांडवली मालाची फार जरूर आहे.

**सक्करला कुलपांचा कारखाना**— सक्कर येथे कुलपें, बकल्स व चामड्याच्या ट्रंकांना लागणाऱ्या क्लिप्स तयार करण्याचा एक कारखाना सुरू करण्यांत आला आहे. ह्या कारखान्यांत भारतांतून परांगदा झालेले ६० कारागीर काम करीत आहेत. कारखान्यांत रोज १५ ग्रोस कुलपें, २५ ग्रोस क्लिप्स आणि २५ ग्रोस सूट केसेसचीं हॅण्डलस् तयार होतात. हा माल जर्मनी व इंग्लंडमध्यें तयार होणाऱ्या मालाच्या तोडीचा असतो.

**अफगाणिस्थान-रशिया व्यापारी करार**— रशिया आणि अफगाणिस्थान ह्या देशांच्या दरम्यान चार वर्षे मुदतीच्या एका व्यापारी करारावर नुकत्याच सह्या करण्यांत आल्या. दोन्ही देशांत आजपर्यंत व्यापार होत असे; परंतु करारावर सरकारी नियंत्रण असल्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. करारांतील कलमान्वयें दोन्ही राष्ट्रांना समान हक्क देण्यांत आले असल्याचें समजतें.

**शेतकऱ्यांना रासायनिक खतें**— मद्रास सरकारनें पूर्व व पश्चिम गोदावरी, गुंटूर, नेलोर, तंजोर इत्यादि जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना रासायनिक खतें पुरविण्याची एक योजना अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. हीं खतें विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना सढळ हातानें कर्ज देण्यांत येणार आहे. पुढील वर्षाचें पीक हातीं आल्यावर कर्जाची फेड करून घेण्यांत येणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २१ जून, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतांतील वनस्पतीचा धंदा*

( वनस्पती : स्निग्ध स्वरूपांतलें खाण्याचें तेल )

भारतांत वनस्पती तयार करण्याला किंवा तिची आयात कर- ण्याला बंदी करणारें एक बिल पं. भार्गव हे हिंदी पार्ले- मेंटांत लवकरच मांडणार आहेत. त्यांचें बिल लोकांच्या मताच्या अजमावणीसाठी सर्व देशभर प्रसृत करण्यांत येईल. सुमारें अडीच वर्षांपूर्वी त्यावेळचे अन्नमंत्री डॉ. राजेंद्र प्रसाद ह्यांनीं, इज्जतनगर येथील संशोधनाच्या आधारें मध्यवर्ती विधिमंडळांत सांगितलें कीं, वनस्पतीच्या सेवनानें उंदरांवर अपायकारक परिणाम झाला आहे. हें संशोधन वास्तविक पुरें झालेलें नव्हतें. तथापि, वनस्पतीच्या विरोधकांनीं डॉ. राजेंद्र प्रसाद ह्यांच्या उद्गारांचा प्रचारासाठी भरपूर फायदा घेतला. डॉ. राजेंद्र प्रसादांनीं पुढें दहा प्रमुख शास्त्र- ज्ञांची समिति नेमून ह्या प्रकरणीं तिचा अहवाल मागितला. ह्या समितीनें मुंबई, बंगलोर, कुन्नूर, इत्यादि ठिकाणच्या सरकारी प्रयोगशाळांतील प्रयोगांच्या आधारावर अहवाल सादर केला. वनस्पतीचा उंदरांवर अगर माणसांवर कोणताहि अनिष्ट परिणाम होत नाहीं; खाण्याचीं तेलें व तुपें ह्यांचेशीं तुलना करतां वनस्पती त्यांच्यासारखीच आरोग्यकारक वस्तु आहे, असें आढळून आलें. त्या कारणानें वनस्पतीच्या कारखानदारांना मोठाच आधार निर्माण झाला. तथापि, वनस्पतीविरुद्ध झालेल्या व होत असलेल्या प्रचाराचें आकडेवारीनें व शास्त्रशुद्ध निराकरण करणें श्री. भार्गव ह्यांच्या बिलामुळें आवश्यक झालें. आजच्या टंचाईच्या काळांत वनस्पतीच्या उपयुक्ततेविषयीं वादच नाहीं; परंतु तिच्या सेवनामुळें कोणत्याहि प्रकारचा अपाय होत नाहीं, ती आहारयोग्य आहे, इत्यादि गोष्टी समजावून सांगण्यासाठी श्री. डहाणूकर ह्यांनीं प्रस्तुत पुस्तिका लिहून प्रसिद्ध केली आहे. वनस्पति ही वस्तु काय आहे, तिचे गुणधर्म कोणते, तीपासून शरिराचें पोषण कसें होतें, तिचा तुलनात्मक कस किती, तिचे विरुद्ध कोणते आक्षेप घेतले जातात, वस्तुस्थिति काय आहे, इत्यादि गोष्टींचें सांगोपांग विवेचन श्री. डहाणूकर ह्यांनीं केलें असून तें उद्बोधक झालें आहे.

हिंदुस्थानांत वनस्पतीचा पहिला कारखाना १९२२ च्या सुमारास टाटापुरम् येथें सुरू झाला. परंतु १९३१-३२ सालीं जग- प्रसिद्ध लिव्हर ब्रदर्स या कंपनीनें मुंबईस मोठ्या प्रमाणावर सुरू केलेल्या 'हिंदुस्थान वनस्पति मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' तून माल तयार होऊन बाजारपेठेंत येऊं लागल्यावरच या धंद्यास महत्त्व प्राप्त झालें. तरीही १९४० पर्यंत हिंदुस्थानांत अवघे १०-१२ कारखानेच होते, व या सर्व कारखान्यांचें सालिना उत्पादन सुमारें ३० हजार टनाइतकेंच होतें. वनस्पतीचा धंदा १९४० नंतर विशेष प्रमाणांत ऊर्जितावस्थेस आला. लढाईच्या दिवसांत लढाऊ सैन्या- साठी व इतर सरकारी उपयोगासाठी वनस्पतीची मागणी वाढली. त्यामुळें देशांतील कांहीं साहसी उद्योगपतींनीं पुढें येऊन आपल्या देशांतच वनस्पती तयार करण्याची यंत्रसामुग्री तयार करून कार- खाने सुरू केले. त्यांपैकीं श्री डहाणूकरांनीं नोव्हेंबर १९४३ मध्यें सुरू केलेला अमृत ऑईल मिल मधील सरकारमान्य वनस्पती तयार करणारा संपूर्ण स्वदेशी कारखाना हा हिंदुस्थानांत पहिलाच होय. त्या वेळच्या सरकारनेंही या धंद्याची वाढ योग्य रीतीनें व्हावी म्हणून योजना आंखून देशभर कारखाने उभारण्यासाठी सर्व तऱ्हेची मदत केली. त्याचेंच दृश्य फळ म्हणून आज देशांत सुमारें ४० कारखाने झाले असून आणखी १०-१५ लवकरच तयार होतील.

हल्लीं देशांत असलेल्या कारखान्यांतून सालीना एकंदर सुमारें तीन ते साडे लाख टन वनस्पती उत्पन्न होऊं शकेल. परंतु सध्यां या धंद्यांत असलेल्या अनेक अडचणींमुळें हें उत्पादन पूर्णतः होत नाहीं. गतवर्षी सुमारें १,५०,००० टन वनस्पति उत्पन्न झाली तर यंदा सुमारें १,७५,००० टन उत्पादन होईल असा अंदाज आहे. बाकीचे कारखाने सुरू झाले तर देशांतील वनस्पतीचें सालीना उत्पादन ४,००,०००० टनपर्यंत होऊं शकेल अशी अपेक्षा आहे. या धंद्यामध्यें सुमारें २५ कोटी रुपयांचें भांडवल गुंतलें आहे. तसेंच कारखान्यांत काम करणाऱ्या १५ हजार कामगार व चालक वर्गाचें पोट भरत आहे. याशिवाय या धंद्यास लागणारा कच्चा माल, डबे व लाकडी खोकीं पुरवणें वगैरे जोड धंद्यांतील कामगार मिळून सुमारें ६००,००० कामगारांची उपजीविका या धंद्यावर होत आहे. तसेंच वनस्पतीवर बसविलेल्या एक्साइज आणि इतर करां- पासून सरकारला सालीना चार कोटी रुपयांचें उत्पन्न मिळत आहे. वनस्पतीची पैदास वाढल्यास इजिप्त, अरेबिया, इराण, वगैरे मध्य पूर्वेकडील देश, तसेंच ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा इत्यादि अतिपूर्वे- कडील देश येथें मालाची निर्यात करून आपल्या देशाचा निर्यात व्यापार वाढवितां येईल.

पुस्तिकेच्या लेखकानें दिलेल्या वरील माहितीवरून वनस्पतीच्या धंद्याचें हिंदी औद्योगिक क्षेत्रांतील स्थान कसें महत्त्वाचें आहे, हें लक्षांत येईल. आहाराच्या दृष्टीनें वनस्पती अपायकारक तर नाहींच,परंतु उपकारक असल्यानंतर त्याच्या बंदीमुळें मोठें नुकसानच होईल, हें उघड आहे. पं. भार्गव ह्यांच्या बिलाचा विचार सर्वांगीण दृष्टीनें होईलच. त्याबाबत जनतेला मार्गदर्शन करणारी व माहिती पुरविणारी पुस्तिका श्री. डहाणूकर ह्यांनीं प्रसिद्ध करून उपयुक्त कामगिरी बजावली आहे. ही पुस्तिका प्रचारात्मक नाहीं, हें तिचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल.

*लेखकः—श्री. शांताराम महादेव डहाणूकर, बी.ई., ए. एम. आय ई., ए. एम. (यु. एस. ए.) डायरेक्टर, अमृत ऑईल मिल्स लि., इंडस्ट्रिअल अ‍ॅश्युरन्स बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

---

**मद्रास सरकारच्या पाटबंधाऱ्याच्या योजना**—मद्रास सर- कारनें अन्नधान्याच्या उत्पादनाच्या वाढीसाठीं पांच योजना मंजूर केल्या आहेत. गुंतूर, कृष्णा, द. अर्काट, चिंगलपट आणि राम- नाद ह्या जिल्ह्यांत त्या अंमलांत यावयाच्या आहेत. सर्व योजनांना मिळून ८,८०,००० रुपये खर्च येणार आहे. पाटबंधारे पूर्ण झाल्यावर राज्यांतील तांदुळाचें उत्पादन १,६०० टनांनीं वाढेल असा अंदाज आहे.

## विमाव्यवसायाचा प्रसार कसा वाढेल ?

### श्री. सी. बा. जोशी ह्यांच्या सूचना

दि गुडविल अ‍ॅशुअरन्स कं. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर व चेअरमन, श्री. सी. बा. जोशी, बी. ई.; ए. एम. आय ई. ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेचे वेळीं जें भाषण केलें, त्यांतील कित्येक मुद्दे अत्यंत महत्त्वाचे असून त्यांकडे हितसंबंधीयांचें लक्ष वेधणें अगत्याचें आहे. नव्या विमा कायद्यानें विमा कंपन्यांवर देखरेख करण्यासाठी नेमावयाच्या कंट्रोलर ऑफ इन्शुअरन्सला निवाड्याचे कांहीं अधिकार देण्यांत आले आहेत त्यांचा दुरुपयोग होण्याची भीति श्री. जोशी ह्यांनीं व्यक्त केली आहे. स्वतःच्याच किंवा हाताखालच्या अधिकाऱ्याच्या निकालावरील अपील त्यास ऐकावें लागेल आणि त्यावेळीं त्याला हायकोर्ट जज्जाप्रमाणें स्वतंत्र वृत्ति दाखवितां येईल काय? हें काम योग्य रीतीनें पार पाडण्यासाठी, त्याच्या जोडीस एक न्याय अधिकारी व स्वतंत्र अ‍ॅक्चुअरी दिला गेला असता, तर बरें झालें असतें. कंट्रोलर ऑफ इन्शुअरन्सचे कांहीं दुय्यम अधिकारी भारतांतील प्रमुख शहरीं ठेवण्यांत आले तर कायद्याविषयींच्या शंकांचें निवारण व कायद्याचें पालन होणें सुलभ जाईल अशीहि श्री. जोशी ह्यांची सूचना आहे. कंट्रोलरनें मुंबई, कलकत्ता, मद्रास इत्यादि शहरांस वारंवार भेटी देऊन तेथें कांहीं दिवस मुक्काम केला तर कंपन्यांची मोठीच सोय होईल. कारण त्यामुळें वेळेची बरीच बचत होऊं शकेल.

खेडेगांवांतील लहान सहान शिलका एकत्रित करून त्यांचा उत्पादक विनियोग होण्याच्या दृष्टीनें सूचना करण्याचें काम सरकारनें रूरल बँकिंग समितीकडे सोंपविलें होतें. विमाव्यवसाय हें काम चांगल्या रीतीनें कसें करूं शकेल, हें सांगतांना श्री. जोशी यांनीं दोन सूचना केल्या आहेत:— (१) पोस्टल सेव्हिंग्ज बँकांचे मार्फत विमा कंपन्यांच्या हप्त्यांची वसुली केली जावी. योग्य वेळीं सेव्हिंग्ज बँकांनीं विम्याच्या हप्त्यांची रक्कम कंपनीचे नांवें वर्ग करावी. अशी व्यवस्था झाल्यास विमेदारांची फारच सोय होणार आहे. (२) शिक्षकांना विमा कंपन्यांचे एजंट होण्यास परवानगी देण्यांत यावी. त्यासंबंधांतील निर्बंध सैल करण्यांत यावेत.

सरकारनें काय करावें हें सांगितल्यानंतर श्री. जोशी ह्यांनीं विमा कंपन्यांनाहि कांहीं सूचना केल्या.

(१) दूरच्या ठिकाणीं मुख्य कचेरी असणाऱ्या कंपन्यांकडून आपल्या वारसांना क्लेमचे पैसे फार कष्ट न पडतां मिळूं शकतील किंवा नाहीं, ह्याची कित्येकांना भीति वाटते ती दूर होणें अगत्याचें आहे. वेगवेगळ्या ठिकाणीं कंपन्यांनीं शाखा उघडून त्यांना क्लेम मंजूर करणें, कर्जे देणें, असाइनमेंटस व नॉमिनेशन्स नोंदणें, इत्यादींचे अधिकार दिले तर विमेदारांत विश्वास निर्माण होऊन क्लेमचे पैसे मिळण्याबाबत त्यांना शंका वाटणार नाहीं. (२) विमेदारांच्या आरोग्याबद्दलची व मृत्यूबद्दलची आकडेवारी माहिती एकत्रित करणें अगत्याचें आहे. अशी माहिती आज सोइस्करपणें उपलब्ध नसल्याकारणानें, सरासरीपेक्षां कमी दर्जाच्या आरोग्याच्या लोकांचे विमे उतरवून, ज्यांना खरोखरीच विम्याची आवश्यकता ज्यास्त अशांना त्याचें संरक्षण देणें मुष्कीलीचें होऊन बसतें. मधुमेहासारख्या विकाराच्या मनुष्याचा विमा कोणत्या दरानें व कोणत्या पद्धतीनें उतरावा, हें ठरवणें कठीण जातें. ह्यासंबंधांत विदेशी कंपन्यांचें अनुकरण करणें इष्ट होईल.

(गुडविल कंपनीनें आपली मुख्य कचेरी तीन वर्षांपूर्वी कुपवाडहून मुंबई येथें नेली, तेव्हांपासून तिची प्रगति अखंड चालू आहे. १९४९ मध्यें तिनें १० लक्ष रुपयांचें नवें काम पुरें केलें. लाइफ फंड ५,८६,४९५ रुपये झाला आहे. लाइफ फंडावर ३·५३% व्याज सुटलें. व्यवस्था खर्च १५·९% इतका खाली आला. प्रत्येक विम्याची सरासरी रक्कम २,०६८ रु. होती. कंपनीच्या स्वतःच्या इमारतीचें बांधकाम दादर येथील तिच्या प्लॉटवर चालू झालें आहे. इमारत एका वर्षांत पुरी होईल. श्री. सी. बा. जोशी हे कंपनीचे ६-८-४९ पासून मॅनेजिंग डायरेक्टर असून १५-१२-४९ पासून ते तिचे चेअरमन आहेत. श्री. जोशी ह्यांच्या वृत्तीचा व कर्तृत्वाचा गृहस्थ ह्या स्थानीं "गुडविलला" लाभला, ह्याबद्दल तिच्या विमेदारांचें व ठेवीदारांच अभिनंदन केलें पाहिजे.)

## हिंदी परराष्ट्रीय व्यापार

### डॉलर हुंडणावळीची परिस्थिति

१९४९-५० मध्यें भारतानें डॉलर गटाच्या देशांकडे १०० कोटी, ९१ लक्ष रुपयांचा माल निर्गत केला. १०५ कोटी, ६१ लक्ष रुपयांची आयात केली. म्हणजे, ह्या व्यापारांत ४ कोटी, ७० लक्ष रुपयांची तूट आली. सप्टेंबर १९४९ मध्यें रुपयाचें अवमूल्यन झालें तेव्हांपासून दर महिन्याच्या आयात-निर्गतींत ५ कोटींचा वाढावा उरत असला तरी त्या पूर्वीची घट मोठी असल्याकारणानें सबंध वर्षाचा आढावा तूटच दाखवीत आहे. अवमूल्यनानंतर आयात कमी झाली असून निर्गत वाढली आहे.

| | निर्गत (लक्ष रु.) | आयात (लक्ष रु.) |
|---|---|---|
| नोव्हेंबर १९४९ | १३५३ | ८८६ |
| डिसेंबर १९४९ | ११०४ | ६३३ |
| जानेवारी १९५० | ९७४ | ५९१ |
| फेब्रुवारी १९५० | ११४९ | ५४२ |
| मार्च १९५० | १०८५ | ५९१ |

वरील पांच महिन्यांचा हिशेब वेगळा केला, तर आयातीपेक्षा निर्गत २४·२२ कोटी रुपयांनीं जास्त झालेली आढळते. वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत मासिक आयात सरासरीनें १० कोटी रुपये होती, तर दुसऱ्या सहामाहींत ती ७ कोटींच्या आसपास राहिली.

### दुर्लभ व सुलभ चलनांच्या देशांची ताजी यादी

भारतांत आयात व भारतांतून निर्गत, ह्यांच्या दृष्टीनें सुलभ व दुर्लभ चलनांच्या देशांची यादी दुरुस्त करण्यांत आली आहे ती खाली दिली आहे.

**(अ) डॉलर गट**—अमेरिका, अमेरिकेच्या वर्चस्वाखालील प्रदेश, कॅनडा (न्यू फौंडलंडसह), फिलिपाइन्स, बोलिव्हिया, कोलंबिया, कोस्टारिका, क्युबा, डोमिनिकन रिपब्लिक, इक्वेडॉर, ग्वाटेमाला, हैटी, होंडुरास, मेक्सिको, निकारॅग्वे, पनामा, साल्व्हेडार, वेनेझुएला व लैबेरिया.

**(ब) दुर्लभ चलन गट**—अर्जेंटिना, बेलजम व त्याच्या वर्चस्वाखालील प्रदेश, पश्चिम जर्मनी (सार वगळून), स्वित्झरलंड व जपान.

**(क) मध्यम चलन गट**—पोर्तुगाल व त्याच्या वर्चस्वाखालील प्रदेश (पोर्तुगीज इंडिया वगळून)

**(ड) सुलभ चलन गट**—बाकीचे सर्व देश (पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका वगळून)

## टाटा कंपनीचें नवें डिव्हिडंड

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचें ३१ मार्च १९५० अखेरच्या वर्षाचें डिव्हिडंड जाहीर झालें आहे. डिफर्ड शेअर्सवर ७९ रु. ५ आ. व ऑर्डिनरी शेअर्सवर १६ रु. डिव्हिडंड मिळणार आहे. गेलीं दोन वर्षे अनुक्रमें ६४ रु. १५ आ. व १४ रु. असा डिव्हि-डंडचा दर होता. १९४९-५० सालासाठीं डिफर्ड शेअर्सना एकूण ३८.६ लक्ष रुपये डिव्हिडंड मिळेल. त्यापूर्वीची दोन वर्षे ती रक्कम ३१.६ लक्ष रुपये होती. ऑर्डिनरी भागांच्या वाट्यास पूर्वीच्या १.३७ कोटी रुपयांऐवजी १.५१ कोटी रुपये येतील. टाटा स्टील डिव्हिडंडचा तुलनात्मक तक्ता खालीं दिला आहे.

डिव्हिडंडमधील चढ–उतार

| वर्ष | प्रत्येक शेअरवर डिव्हिडंड ( रु. ) ऑर्डिनरी | डिफर्ड |
|---|---|---|
| १९३४–३५ | नाहीं | नाहीं |
| १९३५–३६ | ६ | ७–८ |
| १९३६–३७ | १० | ३६-३-६ |
| १९३७–३८ | १५–८ | ७५-११-३ |
| १९३८–३९ | १८ | ९३-१०-५ |
| १९३९–४० | २५ | १४३-१४-७ |
| १९४०–४१ | २९ | १७२-१०-० |
| १९४१–४२ | २७ | १५८-४-४ |
| १९४२–४३ | २३ | १२९-८-९ |
| १९४३–४४ | २३ | १२९-८-९ |
| १९४४–४५ | २३ | १२९-८-९ |
| १९४५–४६ | २३ | १२९-८-९ |
| १९४६–४७ | १९ | १००-१३-४ |
| १९४७–४८ | १४ | ६४-१५-० |
| १९४८–४९ | १४ | ६४-१५-० |
| १९४९–५० | १६ | ७९-५-० |

वरील आकड्यांवरून असें दिसून येईल कीं, डिव्हिडंडचा दर १९४१ सालीं सर्वांत जास्त, म्हणजे अनुक्रमें २९ रु. व १७२ रु. १० आ. असा होता.

### दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को. बँक लि., सोलापूर.
### मंगळवेढा शाखेचें उद्घाटन

स्वागतपर पद्य झालेवर मंगळवेढा येथे वरील बँकेची शाखा मे. आर. एस. पाटील., डे. रजिस्ट्रारसाहेब यांचे अध्यक्षतेखालीं उघडल्याचें जाहीर करण्यांत आलें. समारंभाची जागा प्रशस्त म्युनिसिपल हॉलमध्यें होती. तालुक्यांतील सोसायट्यांचे प्रतिनिधी व गांवांतील प्रतिष्ठित नागरीक यांनीं हॉल भरगच्च फुलून गेला होता. बँकेचे व्हा. चेअरमन श्री. जी. डी. साठे, यांचें प्रास्ताविक भाषण झाल्यावर मे. डेप्युटी रजिस्ट्रारसाहेब यांनीं शाखा उघड-ल्याचें जाहीर केलें. शेठ जयनारायण जगन्नाथ मर्दा, श्री. रंगनाथ मल्हार पाटील वाळेकर, मे. व्ही. एस. वडगवाळकर वकील, राव-साहेब गणपतराव पाटील करमाळा, यांचीं समयोचित भाषणें झालीं व वंदेमातरम् होऊन गोड समारंभ फारच उत्साहानें पार पडला.

### बँक डिस्प्यूटस् ट्रायब्यूनलचें काम जुलै अखेर संपणार

ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल ( बँक डिस्प्यूटस ) चें काम जुलै १९५० अखेर संपेल अशी अपेक्षा आहे. ट्रायब्यूनलचें अवार्ड भारत सरकारला सादर करण्यांत आल्यानंतर एका महि-न्याचे आंत अवार्ड गॅझेटांत प्रसिद्ध होईल.

## बँकिंग कंपनीज कायद्याच्या १७ व्या कलमांत दुरुस्ती

मार्च १९४९ मध्यें बँकिंग कंपनीज अॅक्ट अंमलांत आला, त्यापूर्वी शेड्यूल्ड बँकांवर रिझर्व्ह फंडाबाबत कांहींहि बंधन नव्हतें. त्यांनीं रिझर्व्ह फंड काढला नसता तरी तें पूर्णपणें कायदेशीर होतें. तथापि, ह्या बँका दरसाल आपल्या नफ्यापैकीं कांहीं भाग रिझर्व्ह फंडांत हमखास टाकीत असत. आतां बँकिंग कंपनीज अॅक्टचें १७ वें कलम सांगतें, "प्रत्येक बँकिंग कंपनीनें रिझर्व्ह फंड राखलाच पाहिजे; दरसालच्या निव्वळ नफ्यांतून डिव्हिडंड जाहीर करण्यापूर्वी २०% नफ्याइतकी रकम रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केली पाहिजे; हा फंड वसूल भांडवलाच्या बरोबरीइतका होईपर्यंत अशा रितीनें करीत गेलें पाहिजे." दरसाल रिझर्व्ह फंडांत रकम टाकली, म्हणजे त्या फंडांतून मागून पैसे काढण्यास प्रस्तुत कलमानें हरकत केलेली नाहीं, असा कांहीं बँकांनीं त्या कलमाचा अर्थ लावला. त्यामुळें, रिझर्व्ह बँकेस स्वतःचें मत खालीलप्रमाणें स्पष्ट करणें भाग पडलें:—

"रिझर्व्ह फंड वसूल भांडवलाच्या इतका होईपर्यंत त्यांतून रकमा काढतां येणार नाहींत. तो वसूल भांडवलापेक्षा जास्त झाल्यानंतर त्यांतून रकमा काढल्यामुळें वसूल भांडवलापेक्षा तो कमी होता कामा नये; अॅक्टाचें १७ वें कलम मार्च १९४९ मध्यें अंमलांत आलें त्यापूर्वी जो रिझर्व्ह फंड राखलेला असेल तो १७ व्या कलमाखालीलच समजण्यांत येऊन त्या कलमांत सांगितल्या-प्रमाणें बंदिस्त राखण्यांत यावा."

ह्याचा अर्थ असा झाला कीं, अॅक्ट अंमलांत येण्यापूर्वी बँकांनीं जो रिझर्व्ह फंड निर्माण केला, त्याची रकम वसूल भांडवलापेक्षा जास्त नसल्यास, त्या फंडासहि बँकांना कोणत्याहि कारणासाठीं हात लावतां येणार नाहीं. बँक लिक्विडेशनमध्यें गेली तरच तो फंड उपयोगास येणार; परंतु बँक चालू ठेवण्यासाठीं त्याचा विनियोग करतां येणार नाहीं. एकाद्या वर्षी एकाद्या बँकेस बुडीत कर्जामुळें किंवा इन्व्हेस्टमेंटमधील तुटीमुळें नुकसान आलें आणि नफ्यांतून तें भागवितां येण्याजोगें नसेल तर तिचेजवळ प्रचंड रिझर्व्ह फंड असूनहि तो तसाच कायम ठेवून दुसऱ्या बाजूस तोटा दाखवावा लागेल. हें नुकसान भरून येईपर्यंत ताळेबंदांत असेच आकडे दिसत रहातील.

इंडियन बँक्स असोसिएशननें ह्या संबंधांत भारत सरकारकडे तक्रार करून प्रस्तुत कलमाचें बंधन कसें अव्यवहार्य ठरेल, हें स्पष्ट करून सांगितलें. बँकांना नफ्यापैकीं सुमारें ५०% कर द्यावा लागतो, तेव्हां २०% रिझर्व्ह फंडांत गेल्यावर फक्त ३०% रकम उरते ती डिव्हिडंड वाटण्यास अपुरी आहे, असें असोसिएशननें कळविलें. १७ व्या कलमानें रिझर्व्ह फंड काढण्यास सांगितलें, परंतु त्याच्या विनियोगाबाबत कांहींच खुलासा केलेला नाहीं. १ कोटी रुपये वसूल भांडवलाच्या बँकेनें १ कोटी रुपयांचा रिझर्व्ह फंड निर्माण केला आणि तिला ठेवीदारांना देण्यासाठीं ५ लक्ष रु. कमी पडले तरी तिला रिझर्व्ह फंडास हात लावतां येणार नाहीं, परंतु ती लिक्विडेशनमध्यें गेल्यावर मात्र रिझर्व्ह फंडाचा उपयोग ठेवीदारांचें देणें देण्याकडे करतां येईल व ठेवीदारांना सर्व रकम मिळेलहि!

भारत सरकारनें हें १७ वें कलम आतां दुरुस्त करण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें आणीबाणीच्या प्रसंगीं बँकांना रिझर्व्ह फंडाचा उपयोग करतां येणार आहे.

## लंडनमधील वहातुकीचें संशोधन

लंडनमधील लोक किती व कसा प्रवास करतात ह्यासंबंधीं संशोधन करून त्याचे आंकडे 'लंडन ट्रान्सपोर्ट' नें नुकतेच प्रसिद्ध केले आहेत. सुमारें ३,००० कुटुंबांतील लोकांच्या प्रवासासंबंधीं जमविलेल्या माहितीवरून हे आंकडे तयार केले आहेत.

सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांचा निम्म्याहून अधिक लोक नियमित (आठवड्यांतून निदान एकदां ठराविक कामासाठीं प्रवास) उपयोग करतात. उरलेल्या वस्तींपैकीं ३७ टक्के चालत अगर सायकलवरून जातात व १० टक्के नियमित प्रवास मुळीच करीत नाहींत. काम करणाऱ्या १०० माणसांपैकीं ५८ जण सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांचा—ट्रॅम्स, बसेस, ट्रॉलिबसेस इ०—उपयोग करतात, १७ जण चालतात, १४ जण सायकली वापरतात, चौघेजण मोटारींतून जातात व दोघेजण इतर साधनें वापरतात.

घरापासून कामाच्या जागेपर्यंत जाण्यास लंडनमधील माणसास सरासरी ४२ मिनिटें लागतात. त्याच्या घरापासून बसस्टॉप अगर स्टेशन सुमारें चार मिनिटांच्या अंतरावर असतें व उतरल्यानंतर त्याला कामाच्या जागीं पोहोंचण्यास सरासरी पांच मिनिटें लागतात, असें या आकड्यांवरून लक्षांत येतें. म्हणजे, वाहनामध्यें त्यानें घालविलेला वेळ सुमारें ३३ मिनिटें असतो. ५६ टक्के लोक सरळ आपल्या कामाच्या जागीं जातात, परंतु उरलेल्या ४४ टक्के लोकांना वाटेंत बस अगर आगगाडी बदलावी लागते.

सोमवार ते शुक्रवार नियमितपणें प्रवास लंडनचे रहिवासी खालील कारणांसाठीं करतातः—

| | |
|---|---|
| कामावर | ७०% |
| शाळेंत | १०% |
| बाजार | ८% |
| करमणूक | ५% |

शनिवारीं कामाला जाणाऱ्यांचें प्रमाण ७० वरून ४८ टक्क्यांवर येतें.

काम करण्याच्या जागीं जाऊन परत येण्याचा सरासरी भाडें खर्च दर व्यक्तीस आठवड्याला ४ शि. १ पेन्स येतो. हाच आंकडा पुरुषांसाठीं ४ शि. ६ पेन्स व स्त्रियांसाठीं ३ शि. ४ पेन्स आहे. दर कुटुंबांत हा खर्च आठवड्यास सुमारें ५ शिलिंग होतो.

लंडनमधील रहिवाशांच्या प्रवासाच्या संबंधींबद्दल आर्थिक संशोधन करून त्याचा उपयोग करण्याचा 'लंडन ट्रान्सपोर्ट'चा उद्देश असल्याचें समजतें.

## साठे बिस्किट अँण्ड चोकोलेट कं. लि.

### पहिल्याच वर्षी ५% डिव्हिडंड

साठे बिस्किट अँण्ड चोकोलेट कं. लि. ता. १० फेब्रुवारी १९४९ रोजीं रजिस्टर करण्यांत आली आणि कंपनीनें साठे बंधूंचा कारखाना १ एप्रिल १९४९ पासून आपल्याकडे घेतला. कंपनीचा ३१ मार्च १९५० अखेरचा ताळेबंद तयार करण्यांत आला असून तो भागीदारांच्या २३ जुलै १९५० रोजींच्या सभेस सादर करण्यांत आला.

चलनाच्या अवमूल्यनापूर्वीच, कंपनीनें अमेरिकेंतून मागविलेली यंत्रसामुग्री येथें येऊन दाखल झाल्यामुळें कंपनीचे सुमारे १½ लक्ष रुपये वांचले आहेत. अद्याप १½ लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री इंग्लंडहून यावयाची आहे. कारखान्याच्या इमारतींचें काम समाधानकारक चालू आहे. बिस्किटांचीं यंत्रें तेथें लवकरच बसवून सुरू होऊं शकतील.

कंपनीचें वसूल भांडवल ८,३४,२५० रुपये असून ठेवी वगैरे १३½ लक्ष रुपयांच्या आहेत. जमीन व इमारती (६,७७,२८६ रु.), यंत्रसामुग्री (६,५४,९५१ रु.), स्टॉक इन ट्रेड (९,६२,९८० रु.) इत्यादि आंकडे जिंदगीच्या बाजूस आहेत. एकूण ताळेबंद २५,९५,९५१ रुपयांचा आहे.

कंपनीनें अहवालाचे वर्षी चोकोलेट व बिस्किटें ह्यांची १५,३१,५४३ रुपयांची विक्री केली. पगार, मजुरी, उत्पादनाचा खर्च, जाहिरात खर्च, विक्री कमिशन, व्याज, घसारा, इत्यादींची तरतूद करून ५२,५०७ रु. निव्वळ नफा उरला. स्टाफला बोनस (१३,२००), प्रॉ. फंड (५,००० रु.), ५% रि. क्यु प्रे. शेअर्स वर ५% डिव्हिडंड (४,३८८ रु.), आर्डिनरी शेअर्सवर ५% डिव्हिडंड (२१,२१८ रु.) अशी नफ्याची वाटणी करून ८,७०१ रु. नफा करासाठी व पुढें ओढण्यासाठीं शिल्लक ठेवला आहे.

श्री. नानासाहेब पुराणिक हे कंपनीचे चेअरमन असून मे. साठे फूड इंडस्ट्रीज लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. तिचे वतीनें श्री. ग. रा. साठे व श्री. डी. आर. साठे हे बोर्डावर आहेत.

## एकनॉमिक अँड सोशल कौन्सिल (ECOSOC)

युनायटेड नेशन्सच्या वरील कौन्सिलचें अधिवेशन ३ जुलै रोजीं जिनीव्हा येथें सुरू झालें. त्याची मध्यवर्ती कचेरी लेक सक्सेस (न्यूयॉर्क) येथें आहे. एकुण १८ देश त्याचे सभासद आहेतः—ऑस्ट्रेलिया, बेल्जम, ब्राझील, कॅनडा, चिली, चीन, चेकोस्लोव्हाकिया, डेन्मार्क, फ्रान्स, भारत, इराण, मेक्झिको, पाकिस्तान, पेरू, पोलंड, रशिया, ग्रेट ब्रिटन व अमेरिका.

युनायटेड नेशन्सचें एक प्रमुख अंग म्हणून ह्या कौन्सिलची स्थापना झाली असून जानेवारी, १९४६ मध्यें त्याच्या कामास खरा प्रारंभ झाला.

आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, इत्यादि प्रश्न सोडविण्याचे कामीं सर्व राष्ट्रांचें सहकार्य मिळविणें, हें कौन्सिलचें उद्दिष्ट आहे. माणुसकीच्या समान पातळीवर आणि धर्म, पंथ, जात, भाषा, लिंग इत्यादि भेद न मानतां सर्वांना एक सारखा दर्जा मिळवून देणें, हें कामहि कौन्सिलच्या कक्षेंत येतें.

कौन्सिलचे १८ सभासद युनायटेड नेशन्सच्या जनरल असेंब्लीनें निवडलेले असतात.

कौन्सिलच्या प्रत्येक सभासद राष्ट्रास एक प्रतिनिधी असतो. एक तृतीयांश सभासद प्रत्येक वर्षी निवृत्त होतात, परंतु ते पुन्हां निवडणुकीस उभे राहूं शकतात.

कौन्सिलचें काम मुख्यतः (१) आर्थिक समिति व (२) सामाजिक समिति ह्या दोहोंच्या द्वारा चालतें. कौन्सिलचें कार्य बहुंशीं वेगवेगळ्या विषयांसाठीं नेमलेल्या फंक्शनल व प्रादेशिक आर्थिक कमिशन्सद्वारांच होत असतें. युरोप, आशिया व अतिपूर्वेकडील देश आणि दक्षिण अमेरिका ह्यांचेसाठीं अशीं रिजनल कमिशन्स आहेत. मध्यपूर्वेसाठीं एक कमिशन नेमलें जाण्याचा संभव आहे.

## लिमिटेड कंपन्यांशीं बँकेचे व्यवहार

### कर्ज काढण्याच्या अधिकाराची छाननी

जेव्हां एखादी कंपनी कर्ज काढण्यासाठीं अर्ज करते, तेव्हां त्या अर्जाची काळजीपूर्वक छाननी करावी लागते. कंपनीला कर्ज उभारण्याचा अधिकार कितपत आहे आणि डॉयरेक्टरांचे त्या बाबत अधिकार कोणते आहेत, ह्या दोन्ही गोष्टींचा विचार करावा लागतो.

व्यापारी कंपन्यांना नेहमींच कर्ज उभारावें लागत असल्या-कारणानें, त्यांना कर्ज उभारण्याचा अधिकार असावाच लागतो. मेमोरँडममध्यें उद्देशांच्या कलमांत कर्ज उभारणीच्या अधिकाराचा उल्लेख केलेलाच असतो. डायरेक्टरांचे कर्जविषयक अधिकार आर्टिकल्समध्यें नमूद केलेले असतात. कित्येक वेळां ह्या अधि-कारास विशिष्ट रकमेची मर्यादा घातलेली असते.

बँकेनें कंपनीच्या अर्जाची छाननी करतांना, तिला कर्ज उभा-रणीचा कितपत अधिकार आहे हें पहाण्यासाठीं तिचा मेमोरँडम पहावा. तारण देण्याबाबत तरतूद काय आहे, हेंही पहावें. कर्ज उभारण्याच्या अधिकारांत तारण देण्याचा अधिकार समाविष्ट असतोच, परंतु कंपनीची मालमत्ता लावून देण्याचे संबंधांत कांहीं अटी आहेत काय हें तपासून पहाणें इष्ट ठरेल. मेमोरँडममधील उद्देशाच्या कलमांत हें सर्व बहुधा आढळेल. कंपनीनें कर्ज उभारणें व त्यास तारण देणें या गोष्टी मेमोरँडमला संमत असल्या म्हणजे कर्ज उभारण्याच्या तपाशिलाकडे वळलें पाहिजे. कांहीं कंपन्यांमध्यें साधारण सभेच्या मंजुरीखेरीज डायरेक्टरांना कर्ज काढतां येत नाहीं. कंपनीला किती रकमेपर्यंत कर्ज उभारण्यास परवानगी आहे, ह्याची नंतर बँकेनें छाननी केली पाहिजे.

जेथें डायरेक्टरांना कर्ज उभारण्याचा अधिकार मर्यादित असेल, तेथें बँकेनें कर्जाची रक्कम निश्चित करतांना कंपनीला असलेलीं कर्जें, गहाण, डिबेंचर्स, डायरेक्टरांकडून घेतलेलीं कर्जें, ठेवी, इत्यादि हिशेबांत घेतलीं पाहिजेत. उराविक रकमेचा ओव्हर-ड्राफ्ट कंपनीच्या नियमांत बसला, तरी मागाहून इतर कर्जें कंपनी करूं शकेल. कंपनी, ओव्हरड्राफ्टची रक्कम मंजूर रकमेच्या खालीं नेऊन इतर ठिकाणांहून कर्ज काढून पुन: ओव्हरड्राफ्टची रक्कम वाढवूं शकेल. म्हणजे कर्ज बँकेच्या डायरेक्टरांच्या अधिकाराचे मर्यादेंत रहाणार नाहीं.

कंपनीनें सर्व ठिकाणाहून घेतलेलीं कर्जें आणि बँकेनें दिलेलें किंवा देऊं केलेलें कर्ज ह्यांची बेरीज मेमोरँडम व आर्टिकल्स ह्यांनीं मंजूर केलेल्या मर्यादेबाहेर नाहीं, असा कंपनीच्या सेक्रेटरीकडून मधून मधून दाखला घेण्याची कांहीं बँकांची पद्धति आहे.

कंपनीला ज्या विशिष्ट कारणासाठीं कर्ज दिलें, त्या कारणा-कडेच त्याचा विनियोग झाला किंवा नाहीं हें पहाण्याची जबाबदारी बँकेवर आहे काय ? कंपनीच्या व्यवहारासाठींच कर्जाचा उपयोग केला आहे असें बँक गृहीत धरूं शकते. कंपनीच्या उद्देशाशीं विसंगत असलेल्या गोष्टीकडे कर्जाचा उपयोग होत आहे, अशी माहिती बँकेस लागली तर मात्र असें गृहीत धरतां येणार नाहीं.

## कारखान्यांतील कामगारांस मिळालेली मजुरी

दि पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टाखालील कामगारांस १९४७ च्या मानानें १९४८ सालीं २३·६% जास्त मजुरीची रक्कम मिळाली. त्यांत रेल्वे वर्कशॉप्समधील कामगारांचा समावेश केलेला नाहीं. १९४८ सालीं एकूण मजुरीची रक्कम १६९ कोटी, ६९ लक्ष रु. झाली; १९४७ सालीं ती १३७ कोटी, २६ लक्ष रु. भरली होती. दरमाणशीं वार्षिक सरासरी मजुरी १९४७ सालीं व १९४८ सालीं अनुक्रमें ७३७ रु. व ८८९ रु. भरली.

खालील तक्त्यांत प्रांतवार तुलनात्मक आकडे दिले आहेत:—

**पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टाखालील कामगार आणि त्यांस मिळालेली मंजुरी.**

| | कामगारांची रोजची सरासरी | | दिलेली एकूण मजुरी | | १९४७ ते १९४८ % वाढ किंवा % घट |
|---|---|---|---|---|---|
| | १९४८ | १९४७ | १९४८ (रु.) | १९४७ (रु.) | |
| अजमीर-मारवाड ... | ८,४६७ | ७,९९५ | ३९,७१,०६९ | ३१,८५,७९६ | +२४·६ |
| आसाम ... | ५६,२१३ | ५२,६६८ | १,७०,२२,३३१ | १,३६,५९,६९९ | +२४·६ |
| बिहार ... | १,२५,७७१ | १,११,५१५ | ११,२१,७१,३३५ | ८,२९,१९,८६९ | +३५·३ |
| मुंबई ... | ६,५८,१४५ | ६,३७,६३९ | ७१,३०,२३,९३१ | ५९,१८,३८,६६७ | +२०·५ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड ... | १,००,४६१ | ९४,५२८ | ४,७०,०९,८४० | ४,२७,१३,५५७ | +१०·१ |
| कूर्ग ... | ३० | ४३ | ७,९५९ | १५,४३१ | −४८·४ |
| दिल्ली ... | ३५,१८८ | २९,८४९ | ३,६४,२६,२०५ | २,६०,७७,८८२ | +३९·७ |
| पू. पंजाब ... | ३२,४६० | २५,२७३ | २,०२,८२,०८२ | १,४४,५३,७०५ | +४०·३ |
| मद्रास ... | २,६४,४२८ | २,६०,२५२ | १३,६१,५३,०७४ | १२,३४,२९,३७५ | +१०·३ |
| ओरिसा ... | ११,३८२ | १०,००७ | ४४,४८,७०९ | ३०,२६,९६१ | +४७·० |
| सं. प्रांत ... | २,१८,३७१ | २,३३,६२१ | १७,४३,५१,६७७ | १३,३४,३२,३९३ | +३०·७ |
| प. बंगाल ... | ६,१६,४१३ | ६,१७,८४४ | ४३,२०,२४,९२२ | ३३,७८,७४,७६४ | +२७·९ |
| एकूण ... | २१,२७,३२९ | २०,८९,२५४ | १,६९,६८,९३,१३८ | १,३७,२६,३८,०९९ | +२३·६ |

### कच्ची फिल्म भारतांत होण्याची शक्यता

म्हैसूर संस्थानांत कृष्णराजसागर तलावाशेजारीं सिनेमाच्या धंद्यास लागणारी कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना निघणार आहे, असें बोललें जातें. भारतांत दरसाल २० कोटी फूट किंवा २½ कोटी चौ. फूट कच्ची फिल्म लागते. १९४९ च्या पहिल्या सहामाहींत भारतानें ५६,६६,८१२ रु. किंमतीची कच्ची फिल्म आयात केली. एका स्विस कंपनीच्या सहकार्यानें निघणाऱ्या ह्या कारखान्यांत प्रारंभीं सुमारें २ कोटी चौ. फूट फिल्म दरसाल काढण्याचा विचार आहे. सेल्युलोज ॲसिटेट व सेल्युलोज नैट्रेट ह्यांचा उपयोग कच्ची फिल्म करण्याकडे होऊं शकेल. हळूहळू इतर प्रकारच्या चांगल्या फिल्म्सहि निघूं शकतील.

### सहकारी संस्थेच्या कर्जाचा बोजा

१९२५ च्या मुंबई कोऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्टाच्या २४ अ कलमाखालीं करावयाच्या "डिक्लेरेशन"ला १९०८ च्या इंडियन रजिस्ट्रेशन ॲक्टाच्या १७(१) (ब) कलमाखालीं स्टॅम्प लावावे लागत नाहींत. कोऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्टाच्या वर उल्लेखिलेल्या कलमाखाली सहकारी संस्थेनें मंजूर केलेलें कर्ज फेडण्याकरितां सभासदानें आपल्या मालकीच्या जमिनीवर बोजा ठेवण्याबाबत डिक्लेरेशन केलें पाहिजे व या बोजासंबंधींचा तपशील रेकॉर्ड ऑफ राईटसमध्यें समाविष्ट केला पाहिजे.

### शांग्रिला बिस्किट कंपनी

शांग्रिला फूड प्रॉडक्टस लि. मुंबई, च्या भांडुप (मुंबई) येथील कारखान्यांत दररोज ७ टन बिस्किटें तयार होतात. एका वर्षांत कंपनीची विक्री मासिक २५,००० रुपयांवरून ३,५०,००० रुपयांवर गेली आहे. पाकिस्तानांतून आलेल्या सुमारें १५० निर्वासित स्त्रिया कारखान्यांत काम करतात. आशिया खंडांतील हा सर्वांत मोठा कारखाना आहे. एका इंग्रज तज्ज्ञाचे देखरेखीखाली उत्पादन करण्यांत येतें.

### टाटा पॉवरचीं डिबेंचर्स

टाटा पॉवर कंपनी लवकरच १ ते १½ कोटी रुपयांचीं डिबेंचर्स काढणार आहे. १९७० सालीं त्यांची परतफेड होऊन व्याजाचा दर ४% राहील. कंपनीच्या वीज निर्मितीमध्यें वाढ करण्याकडे डिबेंचर्सच्या रकमेचा विनियोग केला जाईल.

### न्यूजप्रिंटचा खप

जगांत एकूण न्यूजप्रिंटचा कागद जेवढा खपतो, त्याच्या ८५% खप बारा देशांतच होतो. ते देश म्हणजे अमेरिका, ग्रेट ब्रिटन, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, अर्जेंटिना, स्वीडन, जपान, ऑस्ट्रेलिया, फिनलंड आणि नॉर्वे.

### मुंबई राज्याची लोकसंख्या

मुंबई राज्याची लोकसंख्या आतां ३ कोटी, २६ लक्ष झाली आहे. १,०३,००० मतदारांना एक प्रतिनिधी, ह्या हिशेबानें राज्याच्या नव्या विधिमंडळांत ३१५ सभासद होतील.

### बेंगाल केमिकलचा नफा

बेंगाल केमिकल अँड फार्मास्युटिकल वर्क्स लि. ता. १२ एप्रिल १९५० रोजीं संपलेल्या वर्षी १२,७१,१२१ रु. नफा झाला. ६% डिव्हिडंड मिळणार आहे.

बेडेकर पापड
वापरा.




'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं ४ रु. कूळकायदा (१९३९) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या–प्रतिबंधक कायदा (आवृत्ति ३ री) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., खंडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ता:–लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.